**श्री.जे.एफ.नाईक, प्राथमिक मुख्याध्यापक, शासकीय आश्रमशाळा, वडकळंबी, ता.नवापूर, जि.नंदूरबार यांनी त्यांच्या स्वत:च्या आजारपणावर केलेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळणेबाबत.....**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक.वैद्यक-२००४/प्र.क्र.९७/का-१३**
**मंत्रालय विस्तार, मुंबई -४०० ०३२**
**दिनांक :- १५/७/२००६**

**वाचा:- १)** आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे पत्र क्र.लेखा-वैन/प्र.क्र. /का.९(४), दिनांक २६ जुलै, २००४ व क्र.वैद/प्र.क्र./का.९(२), दि.१२ जून, २००६

२)सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.एमएजी-२००५/९/प्र.क्र१/आरोग्य-३ दिनांक १९ मार्च, २००५

**शासन निर्णय** : आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे दिनांक २६/७/२००४ व दि.१२/६/२००६ चे प्रस्तावास अनुसरुन श्री.जे.एफ.नाईक प्राथमिक मुख्याध्यापक, शासकीय आश्रमशाळा, वडकळंबी, ता.नवापूर, जि.नंदूरबार यांनी त्यांच्या स्वत:च्या आजारावर केलेल्या वैद्यकीय खर्चास शासन मंजूरी देत आहे.

२. श्री.जे.एफ.नाईक, प्राथमिक मुख्याध्यापक यांनी स्वत:च्या आकस्मिक आजारपणामध्ये तातडीच्या उपचारासाठी राज्याबाहेर सुरत येथील खाजगी रुग्णालयात दिनांक १८/२/२००२ ते २८/२/२००२ अशा ११ दिवसांच्या कालावधित आंतररुग्ण म्हणून दाखल झाले होते. त्या उपचारापोटी त्यांना एकूण रुपये ५१,१५६/- इतका खर्च झालेला आहे. या वैद्यकीय उपचारापोटी झालेल्या रुपये ५१,१५६ (रुपये एकावन्न हजार एकशे छप्पन फक्त) इतक्या खर्चाच्या प्रतिपूर्तीस शासन मंजूरी देत आहे. तथापि विशेष बाब म्हणून विहीत मर्यादा रुपये ४०,०००/- ची आर्थिक मर्यादा शिथिल करुन उर्वरित सर्व नियम आदेशातील तरतूदीच्या अधिन राहून सदर मंजूरी देण्यात येत आहे. तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विहित नियमानुसार व प्रस्तावनेतील अ.क्र.३ मधील शासननिर्णयानुसार प्रतिपूर्ती करावयाच्या रक्कमेच्या विहित टक्केवारीच्या मर्यादित परिगणना करण्याची व अनुज्ञेय नसलेल्या बाबीवरील खर्च वगळण्याची कार्यालयाचे दक्षता घ्यावी.

३. या बाबीवर होणारा खर्च वेतन व भत्ते यासाठी मंजूर असलेल्या सन २००६-२००७ या वित्तीय वर्षासाठी मंजूर केलेल्या आर्थिक तरतूदीतून भागविण्यात यावा.

४.    सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००६०७१५१६१०५१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार,

(वि.पु.काळे)
कार्यासन अधिकारी

**प्रति,**

आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना (मूळ कागदपत्रासह) पृ. ५ ते १०७/प
अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नंदूरबार, जि.नंदूरबार
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
जिल्हा कोषागार अधिकारी. जि.नाशिक
उपकोषागार अधिकारी, नंदूरबार, जि.नंदूरबार
मुख्याध्यापक शासकीय आश्रमशाळा, वडकळंबी, ता.नवापूर, जि.नंदूरबार
श्री.जे.एफ.नाईक, प्राथमिक मुख्याध्यापक, शासकीय आश्रमशाळा, वडकळंबी, ता.नवापूर, जि.नंदूरबार (आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचेमार्फत)
निवडनस्ती का-१३, आदिवासी विकास विभाग.